# महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट – अ पदभरतीबाबत प्रसिध्दी पत्रक

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट - अ पदावर निवडीसाठी ऑनलाईन पोर्टलद्वारे पात्र उमेदवारांचे अर्ज मागविण्यात आले आहेत. सदरचे ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत दि. ०१/०२/२०२४ ते दि. १८/०२/२०२४ पर्यंत देण्यात आलेली होती.

उमेदवारांनी भरलेल्या ऑनलाईन अर्जाच्या अनुषंगाने या सोबत MBBS अर्हताधारक उमेदवारांची विभागाने तयार केलेली यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर यादीमध्ये शेवटच्या रकान्यात अर्जा सोबत असलेल्या कागदपत्रे व इतर अनुषंगीक बाबीचे अभिप्राय दिलेले आहेत. त्या अभिप्रायानुसार MBBS अर्हताधारक उमेदवारांना अपुर्ण असलेले कागदपत्रे पुन्हा अपलोड करण्याची संधी देण्यात येत आहे. याचबरोबर उमेदवारांना देण्यात आलेले गुण व अनुभव याचे गुण उमेदवारांनी स्वतः पडताळणी करावी. तसेच या संदर्भात उमेदवारांचे काही आक्षेप असल्यास पोर्टलवर नोंदवावेत. आक्षेप नोंदविण्यासाठी **दोन दिवसांचा ( २३.०२.२०२४ रात्री ११.५९ वाजेपर्यंत )** कालावधी देण्यात येत आहे. सदर कालावधीनंतर आलेले आक्षेप विचारात घेण्यात येणार नाहीत.

सदरची यादी ही फक्त MBBS अर्हताधारक उमेदवारांची असुन यामध्ये PG / Diploma निहाय यादी प्रसिध्द करण्यात आलेली नसुन अर्जदारांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या माहितीच्या पडताळणीसाठी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

***BAMS अर्हताधारक उमेदवारांची यादी स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येईल.**

दिनांक : २१.०२.२०२४

स्वा /-

**आयुक्त, आरोग्य सेवा,**
**मुंबई**

हेल्प लाईन नं. १) ९०२८५२०४३७
२) ०२२-२२६२११८६

## आक्षेप नोंदविण्यासाठी सुचना

१) अर्जदारास आक्षेपांची (objections) नोंद करावयाची असल्यास अर्जदाराने https://morecruitment.maha-arogya.com/objections.aspx या पोर्टलवर जाऊन आपले आक्षेप एकदाच नोंदवावेत.

२) अर्जदाराने पोर्टलवर एकापेक्षा जास्त वेळेस आक्षेपाची (objection) नोंद करु नये. एकापेक्षा जास्त वेळेस केलेल्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही. त्यासाठी आक्षेप सादर करतांना संपुर्ण तयारी करुनच आक्षेप नोंदवावा.

३) आक्षेपासोबत अर्जदाराने संबंधित दस्ताऐवज / प्रमाणपत्रे एकाच PDF File मध्ये upload करावयाची असून PDF File ची क्षमता २ MB पेक्षा जास्त नसावी.

४) प्रसिध्द केलेल्या यादीतील माहिती व्यतिरिक्त इतर कोणतीही माहिती अर्जदाराने आक्षेपा सोबत सादर करु नये.

**५) अर्ज करण्यासाठी जो Mobile क्रमांक आणि e-mail टाकलेला होता तोच Mobile क्रमांक आणि e-mail आक्षेप सादर करताना वापरावा.**

६) आक्षेप नोंदवयाचा कालावधी संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत अर्जदाराचे दस्ताऐवज / प्रमाणपत्रे स्विकारले जाणार नाही.